(11)

गायरान जमिनीचा लागवडीसाठी व इतर उपयोगांसाठी वापर करण्याच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या शिफारशी.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
निर्णय क्रमांक जीआरएस-1070/2616/777-ग-6,
मंत्रालय, मुंबई क्र. 400 032,
दिनांक:- 26 मार्च, 1904.

## शासन निर्णय

लागवडीसाठी जास्तीत जास्त जमीन उपलब्ध करून देण्याच्या सातत्याने होत असलेल्या मागणीमुळे गायरानाखालील जमीन लागवडीकरिता उपलब्ध करून देता येईल किंवा कसे याबाबत वेळोवेळी विचार झालेला आहे. प्रथमत: 1959 साली एका उच्चाधिकार समिती यावर विचार करण्याकरिता स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने केलेली, गायरानाच्या क्षेत्राचे प्रचलित प्रमाण, फेरबदल न करता, कायम ठेवण्याची शिफारस, त्यावेळी मान्य करण्यात आली होती. तथापी, शेतीसाठी गायरानाखालील क्षेत्र मिळण्याची मागणी होतच राहिली. म्हणून आणखी एका उच्चाधिकार समितीकडे हा प्रश्न सोपविण्यात आला होता. सदर समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारून त्यांच्या अंमलबजावणीचे आदेश, शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. एलएआर-[illegible]-10/134520/व, दिनांक 21-12-71 अन्वये सर्व संबंधीत अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. हेच आदेश [illegible] अंमलात आहेत. यानंतरही सातत्याने गायरान जमिनी शेतीसाठी मिळण्याची मागणी होत राहिली, परंतु त्याबरोबर चराईसाठी विशेषत: भूमिहिनांच्या गुरांच्या चराईसाठी गायराने राखून ठेवण्याचीही मागणी होत असल्याने शासनाने ह्या प्रश्नाचा पुनर्विचार करण्यासाठी 1972 साली आणखी एका समितीची नियुक्ती केली. सदरहू समितीपुढे खालील मुद्दे विचारार्थ ठेवण्यात आले होते.

1) जमीन गायरानासाठी राखून ठेवण्यापेक्षा ती लागवडीसाठी उपलब्ध करून द्यावी या लोकांच्या मागणीच्या संदर्भात गावांमध्ये गायरानासाठी जमीन राखून ठेवण्याची मुळात आवश्यकता आहे काय.

2) तसे असेल तर, उच्चाधिकारी समितीने मुक्रर करून दिलेल्या प्रमाणामध्ये काही कपात करता येणे शक्य होईल काय.

3) तसे असेल तर गायरानासाठी काय प्रमाण ठरविण्यात यावे.

4) लागवडीसाठी जमीन उपलब्ध करतेवेळी सार्वजनिक कामांसाठी जमीन राखून ठेवण्यात यावी काय.

5) ज्या ठिकाणी गायरान जमिनी अपुऱ्या आहेत अशा ठिकाणी गायरानासाठी भूमिसंपादन कायद्यान्वये जमीन संपादन करावी काय आणि तसे करावयाचे झाल्यास खर्चाचा भार कोणी उचलावा.

2. वरील विषयाबाबत सदरहू समितीने केलेल्या शिफारशींचा सांकल्याने विचार करून शासनाने आता खालील शिफारशींना मान्यता दिलेली आहे.

[illegible] 26.03.1984

Scanned with CamScanner

अ। ज गायरान म्हणून गणल्या जाणाऱ्या जमिनी या बहुतांशी निकृष्ट दर्जाच्या असून, अशा जमिनीतून लागवडीसाठी दुय्यम दिसणारी जमिन काढून घेऊ नये.

ब। यापूर्वीच्या उच्चस्तरीय समितीने ठरवून दिलेल्या गायरान क्षेत्राच्या प्रमाणात फेरबदल करण्याची गरज नाही.

क। सध्या गायरानासाठी राखून ठेवलेली जमिन अशा स्वरुपाची आहे की, चराऱ्या अर्थाने तिचा कुरण म्हणून जनावरांना विशेष उपयोग होत नाही कारण त्यामध्ये चांगल्या प्रकारचे गवत येत नाही म्हणून अशा जमिनी "फार्म फॉरेस्ट्री" सारख्या योजनांतर्गत सुधारुन त्यावर चांगली कुरणे निर्माण करण्याची अत्यंत गरज आहे.

ड। गायरानासाठी राखून ठेवलेली जमीन, इतरत्र जमीन उपलब्ध नसेल तरच आणि गायरानाचे क्षेत्र त्या गावाच्या एकंदर लागवडीखाली येणाऱ्या क्षेत्राच्या 5 टक्के पेक्षा कमी होत नाही याची खात्री झाल्यावरच सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध करून देण्याबाबत विचार व्हावा.

इ। गायरानासाठी जमीन अपुरी पडत असेल तर संबंधीत ग्रामपंचायतीने भूसंपादनाचा खर्च सोसून गायरानासाठी जरूर खाजगी जमिन संपादन करण्यात प्रत्यवाय नसावा.

3. वरील शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तातडीने करण्यात यावी अशा सूचना आता सर्व जिल्हाधिकाऱ्यांना ह्या आदेशान्वये देण्यात येत आहेत. त्याच प्रमाणे ज्या ग्रामपंचायती त्यांच्याकडे व्यवस्थापनेकरिता असलेली गायराने सुस्थितीत राखण्याच्या दृष्टीने पुरेशी काळजी घेत नाहीत असे आढळून येईल त्याचे विरुद्ध जिल्हाधिकारी यांनी कडक उपाययोजना करावी. तसेच गायरान जमिनीवरील अनधिकृत ठरतील ती सर्व अतिक्रमणे तात्काळ दूर करून सदर जमिनी चराईसाठी उपलब्ध करून द्याव्यात असे जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येत आहे.

4. हे सर्व जिल्हाधिकाऱ्यांस असेही कळविण्यात येते की, वरील 1क। येथील शिफारशीच्या अनुषंगाने गायरान जमिनीपैकी मोठमोठे खंड फलोत्पादन व सामाजिक वनीकरण विभागाच्या योजनांखाली कुरणासाठी विकसित करण्याच्या दृष्टीने त्या विभागाकडे सुपूर्द करण्याच्या दृष्टीने त्यांनी जरूर ती पाहणी करावी आणि स्वयंस्पष्ट प्रस्ताव शासनाच्या संबंधीत विभागाकडे मंजूरीसाठी पाठवावेत.

5. हे आदेश ग्राम विकास विभाग व फलोत्पादन व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या सहमतीने काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही/-
। जयंत दिवाण ।
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

एसाई/30404

Scanned with CamScanner

(९७)

**शासकीय जमीन**
**गायरान जमीन मंजूर करण्याच्या प्रकरणात ग्रामसभेचा ठराव आवश्यक असलेबाबत**

2273

**महसूल व वन विभाग**
**परिपत्रक क्र.जमीन ०८/२००८/प्र.क्र.११३/ज-१**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक : २८ मे, २०१०.**

**वाचा : शासन पत्र महसूल व वन विभाग क्र.एलएनडी-४०८१/२०४००/सी.आर. १५३१-ज-५, दिनांक २३ डिसेंबर, १९८८**

**परिपत्रक**

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१(१) मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीकडे गुरचरणाच्या प्रयोजनासाठी निहीत झालेली गुरचरण जमीन इतर संस्थेस मंजूर करताना, जमीन देण्यास संमती असल्याबाबतचा संबंधित ग्रामपंचायतीचा संमतीदर्शक ठराव प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार संदर्भीय शासन परिपत्रकान्वये गायरान जमीन एखाद्या संस्थेला मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविताना जिल्हाधिकाऱ्यांनी सदरहू जमिनीच्या वितरणाला संबंधित ग्रामपंचायतीने सहमती दिली आहे किंवा नाही हे प्रथम तपासावे, जमिनीचा आगाऊ ताबा देऊ नये असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

२. सन २००३ मध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये सुधारणा करण्यात आली असून त्याद्वारे ग्रामसभेच्या अधिकार व कर्तव्याबाबत कलम ८ क.क. (तीन) नव्याने समाविष्ट करण्यात आले आहे. त्यानुसार पंचायतीच्या अधिकारातंर्गत येणारी कोणतीही जमीन शासकीय प्रयोजनार्थ संबंधित भूमीसंपादन प्राधिकरणाद्वारे संपादीत करण्याच्या कोणत्याही प्रस्तावासंदर्भात पंचायतीकडून निर्णय घेण्यात येण्यापूर्वी पंचायतीला मत कळविण्याचे अधिकार ग्रामसभेस देण्यात आले आहेत. सदर सुधारणा विचारात घेऊन संदर्भीय दि.२३.१२.१९८८च्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने पुढील आदेश देण्यात येत आहेत.

३. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१(१) मधील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीकडे गुरचरणाच्या प्रयोजनासाठी निहीत झालेली गुरचरण जमीन अन्य संस्थेस मंजूर करण्याच्या प्रकरणावर कार्यवाही करताना अथवा मंजूरीचा प्रस्ताव शासनास सादर करताना ग्रामपंचायतीच्या संमतीदर्शक किंवा संमती नसल्याच्या ठरावा सोबत ग्रामसभेचा संमतीदर्शक किंवा संमती नसल्याचा ठराव देखील जोडला असल्याची जिल्हाधिकाऱ्यांनी खात्री करावी.

P:\D.R..\wp25

[कृ.म.प.

Scanned with CamScanner

४. दि.७.३.२००६ चे आदेश व तद्नंतर वेळोवेळी स्वतंत्र आदेशांद्वारे ज्या प्रयोजनासाठी शासकीय जमिनीचा आगाऊ ताबा देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रत्यायोजित केलेले आहेत, त्या प्रयोजनासाठी जमिनीचा आगाऊ ताबा देण्यापूर्वी ग्रामसभेचा व ग्रामपंचायतीचा संमतीदर्शक ठराव असल्याची खात्री जिल्हाधिकारी यांनी करावी. मात्र, अपवादात्मक प्रकरणात केंद्र / राज्य शासनाच्या विभागांना / उपक्रमांना महत्वाच्या आणि तातडीच्या प्रकल्पांसाठी (Projects of vital importance) उदा. पाणीपुरवठा, वीज पुरवठा, संरक्षण व सुरक्षाविषयक बाब, पोलीस ठाणे इत्यादीसाठी आगाऊ ताबा देण्याच्या बाबतीत प्रकरणाचे गांभीर्य व तातडी विचारात घेऊन जिल्हाधिकारी यांनी गुणवत्तेवर निर्णय घ्यावा.

५. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून लागू होतील.

६. सदर आदेश ग्राम विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शिवाजी गोरे)
कार्यासन अधिकारी

सर्व विभागीय आयुक्त
जमाबंदी आयुक्त व संचालक,भूमि अभिलेख,महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व जिल्हाधिकारी / अपर जिल्हाधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (१)मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता / लेखापरिक्षा, महाराष्ट्र राज्य (२) नागपूर
मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव.
पंचायत राज कार्यासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-९, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहाय्यक.
"ज" समुहातील सर्व कार्यासने/उपसचिव/सहसचिव, महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई.
कार्यासन ज-१, महसूल व वन विभाग निवडनस्ती.

---------

क्र कक्ष-४ जमीन (महसूल)/कावि- ७२५ /२०१०
जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम
दिनांक 29/६/ २०१०

P:\G.R..Jwp26
एच-१०८३ -१३।-
प्रति,
१) उपविभागीय अधिकारी, वाशिम / मं.पीर